# Greenlawns School, Worli

वार्षिक परीक्षा (द्वितीय सत्र २३-२४)

मराठी

इयत्ता :- सहावी पूर्णांक:- ८०

दिनांक :- ०८ .०२.२०२४ वेळ –२ तास

सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.

शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.

---

प्रश्न १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-. (१०)

१. पाणी हेच जीवन

२. माझा आवडता पक्षी

३. मी झाड झालो तर...

प्रश्न २) खालील मुद्द्यांचा आधारे गोष्ट तयार करून शीर्षक द्या :- (७)

मुद्दे - झोपलेला सिंह.......... उंदीर अंगावर खेळणे.......... झोपमोड.......... विनंती.......... उंदीर म्हणाला “मी उपकार ठेवीन” .......... पारध्याने सिंहाला दोरखंडाने बांधणे.......... उंदराने दोरखंड कुरतडून सिंहाला मुक्त केले...... तात्पर्य

प्र. ३ खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

आपल्या देशात पूर्वी एक महापराक्रमी राजा होऊन गेले. त्यांचे नाव शिवाजी. शिवाजींच्या आईचे नाव जिजाबाई आणि वडिलांचे नाव शहाजी भोसले होता. शहाजी मोठे सरदार होते. जिजाबाईचा स्वभाव फार प्रेमळ होता. ती फार हुशार व गुणवती होती. तिने शिवबाला लिहायला व वाचायला शिकवले. रामायण व महाभारतातील शूर पुरूषांच्या गोष्टी शिवबाला फार आवडत. शिवबाला वाटे आपणही भीमासारखे व रामासारखे शूर व्हावे. खूप पराक्रम करावा. राजा व्हावे. रामासारखे राज्य करावे. लहानपणापासूनच शिवबा मोठा चपळ आणि हुशार होता. जिजाबाईनांही वाटे आपला मुलगा राजा व्हावा. त्याने आपल्या देशाला आणि प्रजेला गुलामगिरीतून सोडवावे. आपले स्वतंत्र राज्य निर्माण करावे. त्या शिवबाला म्हणत, “शिवबा, तू शूर झाला पाहिजेस.”

प्रश्न

1। शिवाजींच्या आई - वडिलांचे नाव काय होते ? शिवबाची आई कशी होती ? (२)

2 । जिजाबाईचा स्वभाव कसा होता व त्यांनी शिवबाला काय शिकवले ? (२)

P.T.O

3। लहानपणापासूनच शिवबा कसे होते व त्यांना कोणासारखे व्हावे असे वाटे ? (२)

4। जिजाबाई शिवबाला सतत काय म्हणत व का ? (२)

5। वाक्य बनवा : हुशार, शूर (२)

## व्याकरण - विभाग

प्रश्न ४) अ) समानार्थी शब्द लिहा :- (२)

१. श्वान २. देऊळ

आ ) विरुद्धार्थी शब्द लिहा :-. (२)

१. विरोधक २. स्वतः शी

इ) लिंग बदला :- (२)

१. माकड २. सावळा

ई ) वचन बदला :-. (२)

१. आकृती २. चूक

उ) कोणत्याही दोन वाहनांची नावे लिहा. (२)

ऊ) दोन कपड्यांची नावे लिहा लिहा. (२)

ए) खालील वाक्यात काळ ओळखा :- (१)

१. शिवम परीक्षा देण्यासाठी दिल्लीला जाणार .

## साहित्य - विभाग ( Marks – ४० )

प्रश्न ५ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (१२)

१. कुंदाला नदीवर कोणते दृश्य दिसले व त्यांनी काय केले ?

२. सुगरण पक्ष्याला कसबी विणकर का म्हटले आहे ?

३. लेखिकेच्या मते मातृभूमीबद्दल प्रेमभाव का बाळगावा?

४. कारखान्यात धातूपासून कोणकोणत्या वस्तू तयार होतात ?

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (४)

१. चुना कशापासून तयार करतात ?

२. कुंदा केव्हा पोहायला शिकली होती ?

३. सुगरण पक्षी घरटे कुठे बांधतो?

४. झाडे, शेते हिरवीगार कशामुळे झाली होती ?

इ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा - (३)

१. गावतल्या सोना नदीला भरपूर ------------ आले होते .

२. आपल्या सुगरणीसाठी व ---------- एवढे सुरेख घरटे बांधतो .

३. माती आहे म्हणूनच आपण --------- आहोत .

ई) कोण -कोणास म्हणाले :- (३)

१. " तू तर राहतेच याच जळी।।."

२." आता फक्त माझ्या दंडाला घट्ट धर."

३." का मुक्या प्राण्यांना देता त्रास ?"

उ) शब्दार्थ लिहा :- १. गलका वाढणे २. जिन्नस ३. कसब (३)

<u>कविता – विभाग</u>

प्रश्न ६) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:- (६)

१. होळीला कोणता गोड पदार्थ करायचा ?

२. कवीने काय तोडण्यास मनाई केली आहे ?

३. 'घर ' या कवितेच्या कवीचे नाव लिहा.

४. कवयित्रीला सूर्यकिरण का व्हावेसे वाटते ?

५. होळीसाठी मोळी कशाची बांधावी ?

६. कवीने होळीच्या दिवशी कोणती शपथ घ्यायला सांगितली आहे ?

आ ) कोण ते लिहा. (२)

१. गवतावर उतरणारे -

२. धरणीवर उतरणारे -

P.T.O

इ) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा:- (४)

होळीचा ---------------------

-----------------------------

----------------------------

----------------------------- भरील.

ई) शब्दार्थ लिहा :-. १. मिष्कील २. गप्पिष्ट ३. अलगद (३)

-----------×समाप्त ×---------------